सभासद जे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारक आहेत व ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत केले नाही आहेत व कोणतीही चौकशी व/वा तक्रार असल्यास तसेच सभेच्या दरम्यान परोक्ष ई-मतदान वा ई-मतदान (इन्स्टा पोल) मार्फत ईलेक्ट्रॉनिक मीन्स मार्फत मतदानाच्या संबंधात काही असल्यास हेल्प व Frequently Aske व Questions (FAQs) व ई-मतदान युजर मॅन्युअल उपलब्ध डाउनलोड सेक्शन अंतर्गत https://evoting.kfintech.coQm (केफिन वेबसाइट) वा कु. कृष्णा प्रिया मड्डुला, वरिष्ठ व्यवस्थापक - सीक्युरिटीजमध्ये रजिस्ट्रर (युनिट : जस्ट डायल लिमिटेड) केफिन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम, प्लॉट क्र. ३१ व ३२, गच्चीबावळी फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैंदराबाद, तेलंगणा - ५०० ०३२ येथे संपर्क साधावा वा ईमेल priya.maddula@kfintech.com वा einward.ris@kfintech.com व evoting@kfintech.com करावा वा दूर. क्र. ०४०-६७१६२२२२ वा केफिन टोल फ्री क्र. १८००-३०९-४००१ वर संपर्क साधावा वा कोणत्याही पुढील स्पष्टीकरणाकरिता कंपनी सचिव यांना ईमेल आयडी investors@justdial.com वर लेखी अहवाल पाठवावा.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
जस्ट डायल लिमिटेडकरिता
सही/-
दि. २१ जुलै, २०२१ **मनन उदानी**
ठिकाण : मुंबई **कंपनी सचिव**

जाहीर सूचना

सौ. कमल कृष्णकांत कपाडिया या **सुमेर नगर क्र. ३ को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,** एस.व्ही. रोड, कोरा केंद्र समोर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०००९२ च्या सभासद असून शेअर्स **०२६१ ते ०२६५** आणि **फ्लॅट क्र. बी ७०२** च्या धारक यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता **२९.०३.२०१७** रोजीस निधन झाले. त्यांचे पती **श्री. कृष्णकांत कपाडिया** यांचे सुद्धा **२१.०१.२०२०** रोजीस निधन झाले. त्यांचा मुलगा **श्री. जय के. कपाडिया** यांनी सदर मयत सभासदाच्या ठिकाणी सोसायटीमधील त्यांचे सभासदपदा करीता आणि त्यांच्या नावामध्ये सदर फ्लॅट आणि शेअर्स हस्तांतरणाकरीता सोसायटीला अर्ज केला आहे. सदर सोसायटी प्रस्तावित हस्तांतरणाच्या विरोधात दावे आणि आक्षेप जर असल्यास ते मागवित आहे. ते सदर सोसायटीचे सन्मा. सचिव किंवा **श्री. पी. सी. थॉमस,** वकील उच्च न्यायलय, शॉप क्र. १०ए, एस्टी अपार्टमेंटस, साईबाबा नगर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ यांच्या कार्यालयात **१४ दिवसांच्या** आत पृष्ठ्यर्थ कागदपत्रांसह दाखल करावेत, कसूर केल्यास आवश्यक ते करण्यात येईल.

सही/-
(पी. सी. थॉमस)
वकील उच्च न्यायालय
ठिकाण: मुंबई दिनांक: २२/०७/२०२१

जाहीर सूचना

श्रीम. मंदाकिनी जगदिश रावल या **श्री बालासिनोर को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,** स्वामी विवेकानंद रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७ च्या संयुक्त सभासद असून सोसायटीच्या लेआऊटमधील बंगला क्र. ४९ आणि शेअर्स **३७१ ते ३७५** धारक यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता **१९.०७.२०१९** रोजीस निधन झाले.

त्यांचे दोन मुले **श्री. दक्षेश जे. रावल आणि श्री. अमित जे. रावल** यांनी सदर मयताच्या ठिकाणी सोसायटीमधील त्यांचे सभासदपदा करीता आणि त्यांच्या संयुक्त नावामध्ये सदर बंगला आणि शेअर्समधील हक्काचे त्यांचे शेअर्स हस्तांतरणाकरीता सोसायटीला अर्ज केला आहे. सदर सोसायटी प्रस्तावित हस्तांतरणाच्या विरोधात दावे आणि आक्षेप जर असल्यास ते मागवित आहे. ते सदर सोसायटीचे सन्मा. सचिव किंवा **श्री. पी. सी. थॉमस,** वकील उच्च न्यायलय, शॉप क्र. १०ए, एस्टी अपार्टमेंटस, साईबाबा नगर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ यांच्या कार्यालयात **१४ दिवसांच्या** आत पृष्ठ्यर्थ कागदपत्रांसह दाखल करावेत, कसूर केल्यास आवश्यक ते करण्यात येईल.

सही/-
(पी. सी. थॉमस)
वकील उच्च न्यायालय
ठिकाण: मुंबई दिनांक: २२/०७/२०२१

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. योगेश पुखराज बोहरा,** खालील परिशिष्टात अधिक तपशिलवार वर्णन मिळकतीचे मालक आहेत आणि **सौ. पल्लवी एस. नागरकर आणि रणजीत एस. नागारकर** हे इच्छुक खरेदीदार आहेत.

उप-प्रबंधक, तलासरी समक्ष नोंदणीकृत ०१.११.२०१८ दिनांकीत नोंदनीकृत पावती, धारक कागदपत्र क्र. टीएलएस/३१६/२०१८, ११.१०.२०१८ दिनांकीत श्री. अश्विनभाई छोटूभाई सुरती आणि श्री. ललित पन्नालाल वाखरीय (विक्रेते) आणि श्री. योगेश पुखराज बोहरा (खरेदीदार) यांच्यामधील विक्रीकरीता नोंदणीकृत कराराचा सुकृताद्वारे आणि सदर करार द्वारे श्री. योगेश पुखराज बोहरा हे मिळकतीचे मालक आणि हक्कदार आहेत.

सर्व व्यक्तींना सदर मिळकत किंवा कोणत्याही भागामध्ये विक्री, भेट, भाडेपट्टा, वारसा, अदलाबदल, गहाण, प्रभार, धारणाधिकार, विश्वस्त, कब्जा, सुविधाधिकार, जप्ती किंवा याशिवाय कसेहीच्या मार्गे कोणाअही दावा असल्यास लिखित स्वरुपात निम्नस्वाक्षीकारांना त्यांचे कार्यालय **श्री. कुनवार डी. पांड्ये, ॲडव्होकेट्स ॲण्ड असोशिएट्सचे प्रोप्रायटर, वकील उच्च न्यायालय, मुंबई, ज्यांचा पत्ता येथे ऑफिस क्र. १२, बी-२, साईधाम शॉपिंग सेंटर, हतकेश्वर, महादेव चौक, मंगल नगर, १५ क्र. लास्ट बस स्टॉप, जी.सी.सी क्लब जवळ, मिरा रोड (पूर्व), ठाणे** ४०११०७ येथे सदर तारखेपासून १५ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास वरील उल्लेखित श्री. योगेश पुखराज बोहरा हे येथे वर्णन परिशिष्टातील मिळकतीचे यथायोग्य नामाधिकार मालक असल्याचे समजण्यात येईल आणि वरील उल्लेखित १५ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर वकीलांकडून कोणतेही पत्र स्विकारले जाणार नाही आणि त्यानंतर सौ. पल्लवी एस. नागरकर आणि रणजीत एस. नागारकर हे वरील उल्लेखित श्री. योगेश पुखराज बोहरा यांच्यासह कायदेशीर हक्कदाराच्या व्यवहाराची प्रक्रिया करतील आणि पुढे सदर कायदेशीर प्रक्रीया अशा कोणत्याही दाव्यांच्या संदर्भाशिवाय करण्यात येईल, खालील उल्लेखित परिशिष्ट मिळकतीच्ता संदर्भात काही असल्यास ते त्यागित समजण्यात येतील.

मिळकतीचे परिशिष्ट

उप प्रबंधक पालघर/ तलसरीच्या हद्दीत आणि ग्रामपंचायत वेवजी पंचायत समितीच्या हद्दीत गाव-वेवजी, तालूका-तलसरी, जि. पालघर येथे स्थित असलेले आणि वसलेले जमीन धारक गट क्र. आणि उप विभाग २७२/१४, एकूण मोजमापित अंदाजे ०.८४.४ (८४ गुंठाज आणि ४० चौ.मीटर्स).

वकील आणि सॉलिसिटर्स
दिनांक: २२.०७.२०२१ **सही/- श्री. कुनवार डी पांड्ये (वकील उच्च न्यायालय, मुंबई)**
ठिकाण: मुंबई **मोबाईल: ९९६७४५६३७८. ईमेल: info@kdplegal.com वेब: www.kdplegal.com**

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनता आणि सर्व संबंधितांच्या माहितीकरीता याद्वारे सूचना देण्यात येते की, (१) सुवर्णा रमेश कुलकर्णी, (२) रेणूका रमेश कुलकर्णी, (३) शिवांगी रमेश कुलकर्णी, (४) चंद्रकांत रंगनाथ कुलकर्णी, (५) नंदिनी देवेंद्र कुलकर्णी, (६) नीलांबिका केरमन कासद (पूर्वश्रमीची नीलांबिका देवेंद्र कुलकर्णी, (७) ऋषीकेश देवेंद्र कुलकर्णी, (८) योगेश देवेंद्र कुलकर्णी आणि (९) महेश भालचंद्र कुलकर्णी (तेथे आणि यापुढे एकत्रितपणे ''मालक'' म्हणून संदर्भित) प्रथम पक्ष आणि आमचे अशिल, मे. युग डेव्हलपर्स त्यांचे नोंदणीकृत कार्यालय येथे, २४, सोलापूर स्ट्रिट, दाना बंदर, मुंबई ४०० ००९ (तेथे आणि यापुढे एकत्रितपणे ''विकासक'' म्हणून संदर्भित) अन्य पक्ष यांच्यामध्ये झालेला आणि निष्पादित विकास करार दिनांक १ जुलै, २०२१ द्वारे सदर मालकांनी खालील परिशिष्टामध्ये अधिक सविस्तर विवरणीत आणि यापुढे ''सदर मिळकत'' म्हणून संदर्भित मिळकतीच्या पुर्नविकासाकरीता मे. युग डेव्हलपर्स यांना विकासक म्हणून नियुक्त केले आहे.

कोणताही पक्ष किंवा व्यक्तींचे सदर मिळकत किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये किंवा त्यावर विक्री, खरेदी, अदलाबदल, गहाण, बक्षिस, भाडेपट्टा, विश्वस्त, वारसा, कुळवहिवाट, ताबा, परवाना, अभिरक्षा, प्रभार, कर्ज, धारणाधिकार, शेअर, प्रतिज्ञा, वाटप, अभिहस्तांकन, अदलाबदल, भार, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, मृत्युपत्रित दान, उत्तराधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्त हमी, संयुक्त उपक्रम, विकास अधिकार, भागीदारी, आरक्षण, मार्गाचा हक्क, प्रथम नाकारण्याचा हक्क, अग्रक्रयाधिकार, दायित्व, आश्वासन, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम, दिलेला आदेश किंवा कोणत्याही स्वरूपातील समाविष्ट कोणत्याही प्रकारचे कोणतेही हक्क, नामाधिकार, हितसंबंध किंवा दावे असल्याचा दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना खालील नमुद पत्त्यावर सदर सूचना प्रकाशनापासून १४ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे आणि दस्तावेजांसह लेखी स्वरूपात कळवावे. सूचना कालावधीमध्ये कोणतेही वैध दावे प्राप्त न झाल्यास कोणतेही दावे असल्यास ते त्यागित समजले जातील आणि नामाधिकार निर्बाध आणि पणनयोग्य असल्याचे प्रमाणित केले जाईल.

परिशिष्ट (मिळकतीचे वर्णन)

नोंदणी उप-जिल्हा कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगरामधील स्थित त्यावरील उभारलेल्या इमारती आणि संरचनेसह आणि मोजमापित १७८५ चौ. मी. किंवा तत्सम, सी.टी.एस. क्र. १२७८ आणि १२७८ (१ ते ६), १०वा रोड, चेंबुर, मुंबई- ४०० ०७१ धारक प्लॉट क्र. ४३२, चेंबुर गावाचा टी.पी.एस. क्र. ३, कुर्ला तालुका, जिल्हा मुंबई उपनगर येथील तळ + १ उपरील मजल्यांच्या, एकत्रित ११ फ्लॅट्स आणि २ दुकाने असलेल्या त्यावर उभारलेल्या सिद्देश्वर प्रसाद इमारतीसह जमिनीचे ते सर्व भाग आणि विभाग आणि सीमाबध्द -

उत्तर किंवा त्या दिशेस : १०वा रोड.
दक्षिण किंवा त्या दिशेस : सी.टी.एस. क्र. १२७९ असलेला प्लॉट
पूर्व किंवा त्या दिशेस : सी.टी.एस. क्र. १२७७ असलेला प्लॉट
पश्चिम किंवा त्या दिशेस : आर. सी. मार्ग

ठिकाण : मुंबई **निरंजन जगताप ॲण्ड कं. करिता**
विकासकांकरीता वकील पत्ता : १०१, कृष्ण लिला, खोखानी लेन,
दिनांक : २०/०७/२०२१ घाटकोपर स्था. पू., मुंबई-७७

---

asianpaints

एशियन पेंट्स लिमिटेड

सीआयएन: L24220MH1945PLC004598
नोंदणीकृत कार्यालय : ६ए, शांतिनगर
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५
दूरध्वनी क्र.: (०२२) ६२१८ १०००
वेबसाईट: www.asianpaints.com
ईमेल: investor.relations@asianpaints.com

सूचना

इनव्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंडच्या समन्याय भागांचे स्थानांतरण

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १२४ आणि इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ॲथोरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर अँड रिफंड) २०१६ वेळोवेळी बदल केलेले (''आयईपीएफ नियम'') च्या नुसार कंपनीच्या भागधारकांना ही सूचना देण्यात येत आहे.

कंपनी अधिनियम च्या कलम १२४(६) सह वाचलेल्या आयईपीएफ नियमांच्या तरतुदींनुसार, सलग ७ (सात) वर्षे किंवा अधिक काळ प्रदान न केलेल्या किंवा दावा न केलेल्या लाभांशा संबंधित समभाग कंपनीद्वारे इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (''आयईपीएफ'') मध्ये स्थानांतरित केले जाऊ शकतात.

कंपनीने या आधीच सलग ७ (सात) वर्षांकरिता त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशाचा तपशील देवून, इतर गोष्टींसमवेत, नोंदणीकृत असलेल्या संबंधीत भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पत्रव्यवहार केला आहे आणि आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाऊंटमध्ये समभागांचे स्थानांतरण टाळण्याकरिता **शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१** पर्यंत दावा न केलेल्या लाभांशाचे दावे करण्यास संधी उपलब्ध करुन दिली आहे.

आयईपीएफ नियमांच्या नियम ६ च्या अनुसार भागधारकांची नावे आणि त्यांचा फोलिओ नंबर/डिपी आयडी-क्लाईंट आयडी, ज्यांचे भाग आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरण होण्यास पात्र आहेत, या संदर्भातील तपशीलवार माहिती व भागधारकांनी आवश्यक कृती करण्यासाठी लागणारी माहिती आमच्या (**www.asianpaints.com**) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

डिपॉझिटरीज कायदा, १९९६ च्या तरतूदीच्या अंतर्गत कंपनी आयईपीएफ प्राधिकरणाकडे जर न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाचा ठराविक आदेश असल्यास संवैधानिक प्राधिकरणाने असे समभाग आणि लाभांशाचे प्रदान स्तांतरीत करण्यास प्रतिबंधित केले असल्यास किंवा असे समभाग तारण किंवा गहाण ठेवले असल्यास कंपनी समभाग हस्तांतरीत करणार नाहीत.

शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१ पर्यंत भागधारकांकडून सदर समभागांच्या बाबतीत वैध दाव्यांची स्वीकारणी झाली नाही तर समभागांचे आयईपीएफ नियमांच्या अंतर्गत विनिर्दिष्ट प्रक्रियेनुसार आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरण करण्यात येईल.या संबंधीत कृपया नोंद घ्यावी की -

i. *प्रत्यक्ष स्वरुपात भाग असल्यास:* नवीन समभाग जारी केले जातील आणि त्यानंतर कोणतीही सूचना न देता आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरीत करण्यात येतील. तसेच, असे नवीन भाग प्रमाणपत्र जारी केल्यावर आपल्या नावावर नोंदणीकृत असलेले मूळ भाग प्रमाणपत्रे आपोआप निरस्त होतील आणि बॅड डिलेव्हरी असे मानण्यात येतील.
ii. *इलेक्ट्रॉनिक स्वरुपात भाग असल्यास:* सदर भागांचे पुढील कोणतीही सूचना न देता आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउटमध्ये डिपॉजिटरी सहभागीच्या मदतीने थेट स्थानांतरण करण्यात येईल.

हे लक्षात घ्या की, आयईपीएफ नियमाच्या अनुसार आयईपीएफमध्ये स्थानांतरण करावयाचे भाग आणि दावा न केलेल्या लाभांशाच्या बाबतीत कंपनीच्या विरोधात कोणताही दावा दाखल करता येणार नाही. आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरण झाल्यानंतर भागधारकांना ऑनलाईन अर्जाद्वारे आयईपीएफ ॲथोरिटीकडून लाभांशासह समभागांची मागणी करता येईल, त्याबाबतचा तपशिल **www.iepf.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कोणत्याही स्पष्टिकरणाबाबत आमच्या रजिस्ट्रार आणि ट्रांसफर एजंटशी संपर्क साधावा.

टीएसआर दाराशॉ कन्सलटंट्स प्रायव्हेट लिमिटेड
(युनिट: एशियन पेंट्स लिमिटेड)
सी-१०१, १ला मजला, २४७ पार्क, लाल बहादुर शास्त्री मार्ग,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३
टेलिफोन:+९१ २२ ६६५६ ८४८४ फॅक्स: +९१ २२ ६६५६ ८४९४
टोल फ्री नं.: १८०० २१०० १२४
ई-मेल: csg-unit@tcplindia.co.in

एशियन पेंट्स लिमिटेड
सही/-
ठिकाण : मुंबई **आर. जे. जयमुरुगन**
दिनांक : २१/०७/२०२१ **सीएफओ अँड कंपनी सेक्रेटरी**

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, आमचे अशील हे येथील खालील लिहिलेल्या **पहिल्या परिशिष्टात** वर्णिलेली जमीन संपादित करण्यासाठी **मुकंद लिमिटेड** (पूर्वी मुकंद स्टील ॲण्ड आयर्न वर्क्स लि. अशी ज्ञात) भारतीय कंपनी अधिनियम, VII सन १९१३ च्या तरतुदीन्वये मूळ नोंदणीकृत कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालया आहे बजाज भवन, ३रा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २२६, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ (**''कंपनी''**) सह वाटाघाटी करित आहेत. सदर जमीन ही गाव कळवे आणि गाव दिघे च्या गाव हद्दीमध्ये स्थित मोजमापित एकूण अंदाजे ५,९०,३२० चौ. मी. (अंदाजे १४५ एकर्स ३४ गुंठे आणि १२ आणे शी समतुल्य) मोठ्या जमिनीचा भाग आहे आणि विक्री सुविधा आणि आमच्या अशिलांच्या नावे सदर जमिनीच्या हस्तांतरणासाठी काहि सर्व्हे क्र. जे सदर जमिनीचा परिध आणि मोठ्या जमिनीच्या उर्वरित भागावरील आहेत ते उप-विभक्त करण्याच्या प्रक्रियेत आहेत. उप विभक्त करावयाचे सर्व्हे क्रमांक आणि अशा प्रत्येक उपविभक्त भागांच्या संबंधित क्षेत्राचा तपशील येथील खालील लिहिलेल्या **दुसऱ्या परिशिष्ट** नमुद करण्यात आली आहे.

(ए) ज्याअर्थी महाराष्ट्र सरकार (''जीओएम'') ने खालील करारानुसार जीओएमच्या वतीने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याद्वारे अनुक्रमे ५ ऑक्टोबर, १९६३ आणि २१ ऑक्टोबर, १९६४ रोजी निष्पादित दोन सनद (एकत्रित''सनद'') अन्वये आणि द्वारे सदर जमिनीचा भाग कंपनीला मंजुर केला.

(i) त्यातील नमुद अटी आणि शर्तींवर आणि मोबदल्याकरिता गाव कळवे आणि दिघे येथे स्थित एकूण मोजमापित ८७ एकर्स, ११ गुंठे ४ आणे (अंदाजे ३,५३,२१४.९७ चौ. मीटर्स) येथील खालील लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषतः वर्णिलेल्या जमिनीचा काहि भाग आणि विभाग कंपनीसाठी संपादन करण्याचा आदेशामध्ये लॅण्ड ॲक्विझिशन ॲक्ट १८९४ (I सन १८९४) (**''सदर ॲक्ट''**) च्या प्रचलित तरतुदीमध्ये इतर बाबींसह मान्य केलेल्या एका भागाची कंपनी (नंतर मुकंद आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स लि. अशी ज्ञात आणि त्यातील कंपनी असा उल्लेख), दुसऱ्या भागाचे जीओएम द्वारा नंतर महाराष्ट्राचे राज्यपाल (त्यातील ''सरकार'' असा उल्लेख) द्वारे आणि दरम्यान निष्पादित दिनांक २९ जून, १९६१ रोजीच्या करार (**''पहिला करार''**) अन्वये आणि द्वारे.

(ii) त्यातील नमुद अटी आणि शर्तींवर आणि मोबदल्याकरिता गाव कळवे आणि दिघे येथे स्थित एकूण मोजमापित १३ एकर्स, ३ गुंठे १२ आणे (अंदाजे ५२,९८८.५३ चौ. मीटर्स) येथील खालील लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषतः वर्णिलेल्या जमिनीचा काहि भाग आणि विभाग कंपनीसाठी संपादन करण्याचा आदेशामध्ये सदर ॲक्टच्या प्रचलित तरतुदीमध्ये इतर बाबीसह मान्य केलेल्या एका भागाची कंपनी (यानंतर ''कंपनी''असा उल्लेख आणि दुसऱ्या भागाचे जीओएम, दुसऱ्या भागाचे जीओएम द्वारा नंतर महाराष्ट्राचे राज्यपाल (त्यातील ''सरकार'' असा उल्लेख द्वारे आणि दरम्यान निष्पादित दिनांक १४ ऑगस्ट, १९६४ रोजीचा करार (**''दुसरा करार''**) अन्वये आणि द्वारे.

(iii) मूळ सनद कंपनीकडे उपलब्ध आहे. मूळ पहिला करार आणि दुसरा करार (**''मूळ दस्तावेज''**) हा हरवली आणि/किंवा गहाण झाले आहे आणि कंपनीला तपास करणे शक्य नाही.

(बी) कंपनी सदर जमिनीसाठी एकमेव आणि अनन्य हक्कदार आणि ऑक्युपेन्सी क्लास/लॅण्ड साठी सदर जमिनीच्या रूपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांची (ठाणे) मंजुरी मिळविण्याच्या प्रक्रियेत आहे.

(सी) आम्ही सदर जमिनीमधील तिचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंधासाठी कंपनीच्या नामाधिकाराचा तपास करित आहेत, जे, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध ऑक्युपेन्सी क्लास/लॅण्ड साठी रूपांतरणाच्या प्रक्रियेत आहेत.

सर्व व्यक्ती किंवा दावेदार ज्यांचा सदर जमीन (किंवा तिचा कोणताही भाग आणि किंवा त्याचा विकास) आणि/किंवा अन्यथा सदर जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, हस्तांतर, अदलाबदल, अभिहस्तांकन, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, कुळवहिवाट, पोट-कुळवहिवाट, लिव्ह ॲण्ड लायसन्स, काळजीवाहु तत्वाने, गहाण, वारसाहक्क, शेअर, बक्षीस, डिव्हाईस, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, विश्वस्त, इच्छापत्र, अंत्यदान, लाभकारी, कब्जा, सोडून देणे, त्यागणे च्या मार्गाने किंवा कोणत्याही करार विलेख, दस्तावेज, लिखित, अभिहस्तांकन विलेख, विकास करार, लेटर ऑफ इंटेंड मार्फत कोणत्याही अन्य पद्धती, डिव्हाईस, अंत्यदान, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, वाद कोणत्याही कायदे न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करार, किंवा कोणताही बोजा किंवा अन्यथा मार्गाने कोणताही शेअर,हक्क, नामाधिकार, इस्टेट, दावा किंवा हितसंबंध असल्यास आणि (ii) मूळ दस्तावेजांबाबत माहिती किंवा ते ताब्यात असल्याचा दावा करित असल्यास सदर प्रसिद्धी तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांत** निम्नस्वाक्षरीकारांना कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह लेखी स्वरूपात कळविणे याद्वारे आवश्यक आहे, कसूर केल्यास असा दावा, हक्क, नामाधिकार, इस्टेट किंवा हितसंबंध अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि दुर्लक्षित करण्यात येईल आणि त्यागित किंवा परित्यागित केल्याचे समजण्यात येईल आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही आणि आमचे अशील कोणत्याही व्यक्तीचा असा दाव आणि हरकतीच्या कोणत्याही संदर्भाशिवाय वरील सदर व्यवहार पूर्ण करतील.

पहिले परिशिष्ट
(सदर जमीन)

ठाणे महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका, तालुका आणि नोंदणी उप जिल्हा ठाणे, जिल्हा आणि नोंदणी जिल्हा ठाणेच्या हद्दीतील खालील सूचीनुसार सर्व्हे क्रमांक धारक आणि गाव कळवे आणि दिघे च्या हद्दीत स्थित मोजमापित १,९०,२३० चौरस मीटर्स (म्हणजेच अंदाजे ४७ एकर्स) जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध:

उत्तरेला द्वारे : मोठी जमीन (मुकंद लिमिटेड) चा भाग
दक्षिणेला द्वारे : एमआयडीसी प्लॉट बी१ आणि रामु लिमजे नगर
पूर्वेला द्वारे : गव्हर्नमेंट फॉरेस्ट लॅण्ड/पारसिक हिल आणि
पश्चिमेला द्वारे : मुकंदा लिमिटेड/लगतचा ठाणे बेलापूर रोड

वरील प्लॉटमध्ये कंपनीच्या प्लॉटच्या उत्तर, दक्षिण आणि पूर्व बाजूवर बांधलेल्या बाऊंड्री वॉलच्या समावेश आहे.

सदर जमिनीमध्ये समाविष्ट सर्व्हे क्रमांक आणि संलग्न क्षेत्र

गाव कळवे					
अनु. क्र.	सर्व्हे क्रमांक	हेक्टर	क्षेत्र	प्रतिरेअर	चौरस मीटर्स
१	२३८/२	१	९६	६	१९,६६०
२	२३९/१-६	०	४	६	४६०
एकूण		**२**	**१**	**२**	**२०,१२०**

गाव दिघे					
अनु. क्र.	सर्व्हे क्र.	हेक्टर	क्षेत्र	प्रतिरेअर	चौरस मीटर्स
१	४८/२	०	६	३	६३०
२	४९/२	०	६	५	६५०
३	५०	०	३	७	३७०
४	५१/३	०	९	५	९५०
५	५७/३	०	१८	४	१,८४०
६	५८/२	०	१२	९	१,२९०
७	६०	०	०	३	३०
८	६१/२	०	१६	२	१,६२०
९	६९/१ -२ए	०	२६	९	२,६९०
१०	७१/२	१०	६६	९	१,०६,६९०
११	७२	०	११	६	१,१६०
१२	७४	०	२२	४	२,२४०
१३	७५/२	०	५७	३	५,७३०
१४	७६	०	२६	५	२,६५०
१५	७७	०	९	५	९५०
१६	७८	०	४	३	४३०
१७	७९	०	७३	७	७,३७०
१८	८०/२	१	४७	६	१४,७६०
१९	८१/२	०	६	५	६५०
२०	८२/२	०	५४	८	५,४८०
२१	८३	०	२	०	२००
२२	८५/१-२	०	८	६	८६०
२३	८६	०	३	७	३७०
२४	८७/२	०	१५	५	१,५५०
२५	८८/२	०	१	७	१७०
२६	९१/२	०	३	७	३७०
२७	९२	०	०	६	६०
२८	९३/२	०	९	४	९४०
२९	९५/२/बी	०	१६	९	१,६९०
३०	२६०पी	०	१२	०	१,२००
३१	२७२	०	९	२	९२०
३२	२७५/२	०	११	९	१,१९०
३३	२७६	०	५	०	५००
३४	२७७	०	३	४	३४०
३५	२७९	०	४	३	४३०
३६	२८३/२	०	३	४	३४०
३७	३३२	०	८	०	८००
एकूण क्षेत्र		**१७**	**१**	**१**	**१,७०,११०**
एकूण क्षेत्र (कळवे + दिघे)		**१९**	**२**	**३**	**१,९०,२३०**

दुसरे परिशिष्ट
(उप विभक्त होणारी जमीन)

गाव कळवे (क्षेत्र चौरस मीटर्स मध्ये)				
अनु. क्र.	सर्व्हे क्रमांक	मोठी जमीन	सदर जमीन	राखीव जमीन
१	२३८/२	३२,४००	१९,६६०	१२,७४०
२	२३९/१-६	८,१३०	४६०	७,६७०
एकूण क्षेत्र		**४०,५३०**	**२०,१२०**	**२०,४१०**

गाव दिघे (क्षेत्र चौरस मीटर्स मध्ये)				
अनु. क्र.	सर्व्हे क्रमांक	मोठी जमीन	सदर जमीन	राखीव जमीन
१	४९/२	१,८५०	६५०	१,२००
२	५०	१,५००	३७०	१,१३०
३	५१/३	२,४००	९५०	१,४५०
४	५७/३	४,०००	१,८४०	२,१६०
५	५८/२	२,९७०	१,२९०	१,६८०
६	६०	४००	३०	३७०
७	६१/२	४,६३०	१,६२०	३,०१०
८	६९/१ -२ए	३२,६४०	२,६९०	२९,९५०
९	७१/२	१,३१,०००	१०,०६,६९०	२४,३१०
१०	७५/२	६,६५०	५,७३०	९२०
११	८०/२	१८,१००	१४,७६०	३,३४०
१२	८२/२	८,४५०	५,४८०	२,९७०
१३	८५/१-२	४,२५०	८६०	३,३९०
१४	८६	२,७२०	३७०	२,३५०
१५	८७/२	३,६७०	१,५५०	२,१२०
१६	९१/२	१,२७०	३७०	९००
१७	९२	२,४२०	६०	२,३६०
१८	९३/२	३,०००	९४०	२,०६०
१९	९५/२/बी	६,२३०	१,६९०	४,५४०
२०	२७५/२	२,२००	१,१९०	१,०१०
२१	२७६	१,५२०	५००	१,०२०
२२	२७७	३,२००	३४०	२,८६०
२३	२७९	८७०	४३०	४४०
२४	२८३/२	१,०००	३४०	६६०
२५	२६०पी	५,७००	१,२००	४,५००
एकूण क्षेत्र		**२५२,६४०**	**१,५१,९४०**	**१,००,७००**
एकूण क्षेत्र (कळवे + दिघे)		**२,९३,१७०**	**१,७२,०६०**	**१,२१,०१०**

ठिकाण: मुंबई
सदर दिनांक २२ जुलै, २०२१
आशू गुप्ता
भागीदार
शार्दूल अमरचंद मंगलदास ॲण्ड कं.
एक्स्प्रेस टावर्स, २३वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ महाराष्ट्र, भारत.

In Short

लोकोपायलटला पाच लाखांचा फटका

नागपूर : रेल्वेमध्ये लोकोपायलट असलेल्या व्यक्तीने ॲमेझॉनवरून पाचशे रुपयांचा थर्मास ऑर्डर केला. आवडला नाही म्हणून ऑर्डर रद्द केली. पैसे परत मिळावे म्हणून कस्टमर केअरला फोन केला असता सायबर गुन्हेगाराने त्यांना हेरले. त्यांना थर्मासचे ५०० रुपये तर मिळाले नाही, उलट त्यांच्या खात्यातून पाच लाख रुपये लंपास झाले.

विज्ञान प्यारेलाल मेश्राम (५३, रा. शेंडेनगर, टेकानाका) हे रेल्वेत लोकोपायलट म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १८ जुलैला ॲमेझॉनवरून थर्मास ऑर्डर केला. थर्मासची रक्कम ऑनलाइन ट्रान्सफर केली. काही वेळाने थर्मास न आवडल्याने ऑर्डर रद्द केली. परंतु त्यांना पैसे रिफंड झाले नाहीत. त्यांनी गुगलवर सर्च करून ॲमेझॉन कस्टमर केअरचा फोन नंबर शोधून फोन केला. तो क्रमांक सायबर गुन्हेगाराचा होता. मेश्राम यांनी त्या व्यक्तीला थर्मासची ऑर्डर रद्द व पैसे रिफंड करण्यास सांगितले. आरोपीने त्यांना पैसे परत करण्याची हमी दिली. त्यांना मोबाईलमध्ये 'मनी डेस्क' नावाचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. मेश्राम यांनी ॲप डाऊनलोड करीत कस्टमर केअर अधिकाऱ्याला पासवर्ड दिला. काही वेळाने मेश्राम यांच्या बँक खात्यातून ५ लाख २५० रुपये काढण्यात आले. त्यांनी लगेच कस्टमर केअरला कॉल केला, पण तो बंद असल्याचे दिसले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी कपिलनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी सायबर गुन्हेगाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रायफलसह तिघांना अटक

वर्धा : अवैधरीत्या रायफलसह व छर्रे बाळगणाऱ्या तिघांना तळेगाव पोलिसांनी अटक केली. ही कारवाई मंगळवार, २० जुलैच्या रात्री तळेगाव येथील उड्डाण पुलाखाली केली. जराबिरसिंग मुलकसिंग वावरी (१९), करणसिंग जेलसिंग ऊर्फ लहरीसिंग जुनी (२६), मलिंदरसिंग दिलीपसिंग जुनी (१९, तिन्ही रा. काकडधरा, तळेगाव) अशी आरोपींची नावे आहेत. तळेगाव पोलिसांना मुखबिराकडून मिळालेल्या माहितीवरून येथील उड्डाण पुलाखाली धाड घातली असता तिघेजण अवैधरीत्या एक बरमार गन (रायफल) व सात छर्रे मिळून आले. पोलिसांनी तिघांनाही ताब्यात घेत त्यांच्याकडून १५ हजार रुपये किमतीची रायफल व ७० रुपये किमतीचे छर्रे असा १५,०७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पैशाच्या वादातून कोयत्याने वार

अहमदनगर : हातवळण (ता.नगर) येथे जनावरांच्या गोठ्यात मुरुम टाकण्याच्या पैशाच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या वादात एकावर दोघा जणांनी कोयत्याने वार करून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. जनावरांच्या गोठ्यात मुरुम टाकण्याच्या पैशाच्या देवाणघेवाणीवरून वाद होऊन आरोपी शिवाजी विश्वनाथ चेमटे (रा. हातवळण, ता.आष्टी, जि.बीड) व नामदेव निकम (रा. कोयाळ, ता.आष्टी) यांनी कोयत्याने डोक्यात वार करत दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे नवसुपे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी दोघा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

...अन् 'त्या' झाडावरील 'करणी' हटली!

नाशिक : नवीन शाही मार्गावरील पंचवटी अमरधामजवळील एका बाभळीच्या झाडावर करण्यात आलेली 'करणी' अंनिसच्या कार्यकर्त्यांनी काढून टाकली. या 'करणी'प्रकरणाला सर्वप्रथम दै. 'पुण्य नगरी'ने वाचा फोडली होती. त्यानंतर मंगळवारी (दि. २०) आषाढी एकादशीला

पोलिसांच्या मदतीने अंनिसकडून कार्यवाही

अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या ठिकाणी येऊन जादूटोणा करण्यात आलेल्या झाडावरील काळ्या बाहुल्या, लिंबू, बिब्बा ठोकलेले खिळे आदी अंधश्रद्धा पसरवणाऱ्या वस्तू हटवल्या.

पंचवटी अमरधामजवळील एका बाभळीच्या झाडावर करणी, भानामती सारखे अंधश्रद्धा पसरवणारे प्रकार उघडकीस आले होते. याबाबत दै. 'पुण्य नगरी'ने शुक्रवार, १६ जुलैला 'बाभळीच्या झाडावर करणी' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते. याची दखल घेत अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मंगळवारी या झाडावरील करणीचे साहित्य काढून टाकले. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी पंचवटी पोलिसांच्या मदतीने व प्रत्यक्ष सहभागाने या खोडावर ठोकलेल्या वस्तू काढल्या. झाडाच्या खोडाला काळ्या बाहुल्या, लिंबू, कोहळा, नारळ, उडीद, बिबा आदी वस्तू खिळ्याच्या साहाय्याने ठोकलेल्या होत्या. करणी, भानामती, भूतबाधा, जादूटोणा अशा अंधश्रद्धेच्या बाबी सर्व धर्मांमध्ये कमी-अधिक प्रमाणात असल्याचा अंनिसच्या हाती पुरावा लागला. करणी, भानामती, जादूटोणा दूर करण्यास प्रवृत्त करणारी व्यक्ती याच परिसरातील असावी, असा अंदाज अंनिसच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. एकाच वहीच्या पानांवर व एकाच अक्षरात मजकूर लिहिलेला आढळला आहे. पोलिसांनी या भोंदूला शोधून जादूटोणा विरोधी कायद्यान्वये कारवाई करावी, पर्यावरणाचे विद्रुपीकरण करणारे, लोकांमध्ये भीती व अंधश्रद्धा पसरवणारे असे प्रकार थांबवण्यासाठी प्रबोधन करणारे फलक महापालिकेने उभारावेत, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. लोकांनी अंधश्रद्धायुक्त बाबींना बळी पडू नये, तसेच घाबरून जाऊ नये, असे आवाहन अंनिसने केले आहे.

> या झाडावर खिळ्याने ठोकलेल्या अंधश्रद्धा पसरवणाऱ्या वस्तू, कागदावर लिहिलेला घरगुती इच्छा व अपेक्षांसहितचा मजकूर अंनिसने लोकांपुढे उघड केला. संशयितांनी असा प्रकार करण्यासाठी अमरधाम शेजारच्याच बाभळीच्या झाडाला निवडणे, मजकूर लिहिलेली पाने एकाच वहीची असणे आणि मजकूर जरी भिन्न असला, तरी तो एकाच अक्षरात लिहिलेला आहे. आपल्या शत्रूला त्रास व्हावा म्हणून त्याचा पासपोर्ट आकाराचा फोटोही इतर वस्तूसोबत खिळ्याने ठोकलेला होता. बहुतेक मजकूर हा प्रादेशिक भाषा व उर्दूमध्ये होता.

गोपीचंद पडळकरांवर विट्यात गुन्हा दाखल

सांगली : भाजपाचे प्रवक्ते आणि आमदार गोपीचंद पडळकर, सांगली जि.प.चे माजी समाज कल्याण सभापती ब्रह्मानंद पडळकर यांच्यासह अन्य चार जणांवर विटा पोलिसांत गुन्हा दाखल झाला. राज्य शासनाचा बंदी आदेश डावलून बाणूरगड (जि. सांगली) येथे नरवीर बहिर्जी नाईक स्मारकाचे भूमिपूजन कार्यक्रमाच्या वेळी गर्दी जमवली, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

सोमवार, १९ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता खानापूर तालुक्यातील बाणूरगड (जि. सांगली) येथे स्वराज्याच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांच्या स्मारकाचे भूमिपूजन माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.सदाभाऊ खोत होते. हा कार्यक्रम सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदी आदेशाचे उल्लंघन करून झाला. तसेच बहिर्जी नाईक यांच्या स्मारकाच्या ठिकाणी अंदाजे १५० ते १७० लोक उपस्थित होते. त्यामुळे भारतीय दंड संहिता अधिनियम १८६० चे कलम १८८, भारतीय साथरोग अधिनियम १८९७ कलम ११, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अ प्रमाणे बाणूरगडचे सरपंच सज्जन बाबर, नीलेश नेताजी पाटील (रा. खंबाळे (भा)), आ. गोपीचंद पडळकर आणि माजी समाजकल्याण सभापती ब्रम्हानंद पडळकर या चोघांविरोधात विटा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद विट्याचे नायब तहसीलदार चेतन कोनकर यांनी दाखल केली.

वार्षिक साधारण सभेची सूचना

शिक्षण प्रसारक मंडळी
शारदा सभागृह, स.प.महाविद्यालय आवार
पुणे ४११०३०
दूरध्वनी क्रमांक - ०२०-२४३३१३१६

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेची सन २०२०- २०२१ या वर्षावधीतील वार्षिक साधारण सभा दिनांक ७ ऑगस्ट २०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता Zoom Platform द्वारे आयोजित करण्यात आली आहे. सभेची क्रमणिका, मागील सभेचा वृतांत व लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली हिशोब पत्रके शिक्षण प्रसारक मंडळीच्या website www.spmandail.org.in वर उपलब्ध आहेत.

आज्ञेवरून,
चिटणीस
शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे ३०

लसींचे दोन्ही डोस घेतलेल्यांना निर्बंध शिथिल करण्याचा विचार - टोपे

(पान १ वरून) सुरू करण्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, आयसीएमआरने मार्गदर्शक तत्त्वे याबाबत जारी केली तर आपल्याला विचार करता येईल. प्रौढांपेक्षा लहान मुलांमधील संसर्ग कमी असेल, असे आयसीएमआरने निरीक्षण नोंदवले आहे. या संदर्भात अधिक भाष्य करताना ते म्हणाले की, ही नक्कीच जमेची बाजू आहे. तरीही तिसऱ्या लाटेत लहान मुलांना धोका असल्याचा केंद्र सरकारचा इशारा लक्षात घेऊन बाल रोगतज्ज्ञांपासून वाढीव खाटा, व्हेंटिलेटरसह संपूर्ण व्यवस्था सज्ज ठेवली आहे, असे ते म्हणाले.लसीकरणाच्या संदर्भात अधिक माहिती देताना ते म्हणाले की, महिना-दोन महिन्यांच्या आत १०० टक्के लसीकरण पूर्ण करण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. त्यामुळे लसीकरणाला वेग देण्यासाठी मदत करा, अशी आमची केंद्र सरकारकडे मागणी आहे. आम्ही दररोज सरासरी २ ते ३ लाख लसी देत असलो तरी आमची क्षमता किमान १० लाख आणि कमाल १५ लाखांच्यावर आहे.लसींचे दोन्ही डोस झाले, त्यांना लोकल प्रवास करण्याची परवानगी देण्याची मागणी पुढे आली आहे. या संदर्भात बोलताना ते म्हणाले की, टप्प्याटप्प्याने सर्वांचा विचार होत आहे. पण रेल्वे प्रवाशांची तपासणी करण्यासाठी रेल्वेकडे पुरेसे मनुष्यबळ नसावे त्यामुळे रेल्वे प्रवासाबाबत काही निर्णय झालेला नसेल. पण दोन लस घेतली असेल तर आता अनेक निर्बंध शिथिल करायला हवेत, या विचाराबाबत कोणचेही दुमत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राज्याचा टास्क फोर्स याबाबत निश्चितच निर्णय घेईल, अशी आशा राजेश टोपे यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्ह्यात पूरस्थिती

(पान १ वरून) सुरुवात झाली. महाड शहराजवळून वाहणाऱ्या सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नदीचे पाणी शहरात शिरले. त्यामुळे येथील भोईघाट, बाजारपेठ, दस्तुरीनाका परिसर जलमय झाला असून सध्या तेथे फुटभर पाणी आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर महाड शहराला पुराचा वेढा पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हे लक्षात घेऊन व्यापारी आणि नागरिकांनी सामानाची आवराआवर केली आहे, तर काळ नदीचे पाणी वाढल्याने बिरवाडी बाजारपेठेत पाणी शिरले, एमआयडीसी भागातही पाणी रस्त्यावर आले होते. सुधागड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जांभूळपाडा, भेरव आणि पाली पूल पुराच्या पाण्याखाली गेले. त्यामुळे या मार्गांवरील वाहतूक बंद करण्यात आली. आंबा नदी किनाऱ्यावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. पेडली गावात पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जांभूळपाड्यातून माणगाव माणखोऱ्यात जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक तूर्तास बंद करण्यात आली आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यात पुढचे दोन दिवस रेड ॲलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा जिल्हा आपत्ती निवारण कक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

DEAR LOTTERIES
Government Lotteries
रु. 9000 ची 25 बक्षिसे जिंकली!
सोडत दिनांक : 18-07-2021
साईबाबा लॉटरी सेंटर
वेलकम हॉटेलजवळ, घाटकोपर (प). मो. : 8879400425
विजेत्या ग्राहकाचे हार्दिक अभिनंदन!
डियर लॉटरीज् सरकारी लॉटरीज्
दररोज 3 सोडती
फक्त 6 रुपयांत जिंका! पहिले भव्य बक्षिस ₹1 करोड (सुपर बक्षिस मिळून)
मॉर्निंग | डे | इव्हीनिंग

प्रेयसीने घेतलेल्या फासावरच प्रियकराने पत्करले मरण

प्रेमीयुगुलाची आत्महत्या, उत्तरेश्वर पिंप्रीची घटना

बीड : तीन महिन्यांपासून 'लिव्ह इन' मध्ये असलेल्या प्रेमीयुगुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (दि. २१) केज तालुक्यातील उत्तरेश्वर पिंप्री येथे उघडकीस आली. घरगुती वादातून प्रेयसीने गळफास घेतला, त्यानंतर तिचे प्रेत खाली उतरवून प्रियकरानेही त्याच फासावर चढून मरण पत्कारले. या घटनेने 'जियेंगे-मरेंगे साथ-साथ'ची प्रचिती आली.

आकाश शिवाजी धेंडे (२४) व सावित्री आकाश धेंडे (२८) अशी मयतांची नावे आहेत. आकाश आई-वडिलांसह कोल्हापूर येथील रामनगर भागात गेल्या काही महिन्यांपासून मोलमजुरीसाठी स्थलांतरित झाला होता. तो बिगारी काम करायचा. तेथे शेजारीच सावित्री राहत होती. सावित्री विवाहित असून तिला दोन मुले आहेत;परंतु तिच्या पतीचे निधन झालेले आहे. शेजारी राहत असल्याने त्यांची ओळख झाली, त्याचे रुपांतर प्रेमात झाले व प्रेमसंबंध 'लिव्ह इन'पर्यंत येऊन ठेपले. तीन महिन्यांपूर्वी सावित्रीला घेऊन आकाश उत्तरेश्वर पिंप्री येथे आला. त्याचे आई-वडील व सावित्रीची दोन मुले हे कोल्हापूर येथेच होती. दरम्यान, मंगळवारी (दि. २०) रात्री आकाश बाहेर होता. तो घरी नसताना सावित्रीने स्कार्फने घरातच पत्र्याच्या आडूला गळफास घेऊन आत्महत्या केली. आकाश घरी परतल्यावर त्याला धक्काच बसला. प्रेयसीच्या विरहात त्याने त्याच स्कार्फने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

कारण गुलदस्त्यात

आकाश व सावित्री हे दोघेच राहत. मात्र, प्राथमिक तपासात त्यांच्यात गेल्या काही दिवसांपासून पटत नव्हते. अवघ्या तीन महिन्यांत त्यांच्यातील वादाने दोघांचाही बळी घेतला. कौटुंबिक वादाची या घटनेला किनार आहे. मात्र, अद्याप नेमक्या कारणाचा उलगडा झालेला नाही, असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

शेजारणीकडून केली खात्री

आकाश मंगळवारी रात्री बाहेरुन घरी परतला तेव्हा त्याला सावित्रीचे लटकलेले प्रेत आढळून आले. त्याने तातडीने प्रेत खाली उतरवले व धावत जाऊन शेजारच्या वृद्धेला बोलावून घेतले. सावित्रीचा मृत्यू झाल्याचे वृद्धेने सांगितल्यावर आकाश हतबल झाला. वृद्धा आपल्या घरी निघून गेल्यावर त्यानेही टोकाचे पाऊल उचलले.

तलवारीने केक कापणाऱ्यास अटक

सातारा : आपल्या वाढदिवसाचा केक गाडीच्या बोनेटवर बसून तलवारीने कापणाऱ्या चंदननगर कोडोली येथील गुंड वैभव चंद्रकांत जाधव (रा. चंदनगर, एमआयडीसी, सातारा) याला अटक केली आहे. यावेळी त्याच्यासमवेतील दहा ते बारा जणांवर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

छप्पर पडून वृद्ध ठार

नाशिक : वादळी पावसामुळे वाई तालुक्याच्या पश्चिम भागात कोंढावळे येथे बुधवारी अंगावर छप्पर पडून ६५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. वामन जाधव असे त्या वृद्ध व्यक्तीचे नाव असून, ते कातकरी वस्तीत राहत होते. दरम्यान, कोयना पाणलोट क्षेत्रात जोराचा पाऊस सुरू असून बुधवारी ५९ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. गुरुवारी (दि. २२) सकाळी ११ वाजता कोयना नदीत २१०० क्युसेक पाणीचा विसर्ग केला जाणार आहे.

asianpaints

एशियन पेंट्स लिमिटेड
सीआयएन: L24220MH1945PLC004598
नोंदणीकृत कार्यालय : ६ए, शांतिनगर
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५
दूरध्वनी क्र.: (०२२) ६२१८ १०००
वेबसाईट: www.asianpaints.com
ईमेल: investor.relations@asianpaints.com

सूचना

इनव्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंडच्या समन्याय भागांचे स्थानांतरण

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १२४ आणि इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ॲथोरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर अँड रिफंड) २०१६ वेळोवेळी बदल केलेले (''आयईपीएफ नियम'') च्या नुसार कंपनीच्या भागधारकांना ही सूचना देण्यात येत आहे.

कंपनी अधिनियम च्या कलम १२४(६) सह वाचलेल्या आयईपीएफ नियमांच्या तरतुदींनुसार, सलग ७ (सात) वर्षे किंवा अधिक काळ प्रदान न केलेल्या किंवा दावा न केलेल्या लाभांशा संबंधित समभाग कंपनीद्वारे इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (''आयईपीएफ'') मध्ये स्थानांतरित केले जाऊ शकतात.

कंपनीने या आधीच सलग ७ (सात) वर्षांकरिता त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशाचा तपशील देवून, इतर गोष्टींसमवेत, नोंदणीकृत असलेल्या संबंधीत भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पत्रव्यवहार केला आहे आणि आयईपीएफ ॲथोरीटीच्या डिमॅट अकाऊंटमध्ये समभागांचे स्थानांतरण टाळण्याकरिता **शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१** पर्यंत दावा न केलेल्या लाभांशाचे दावे करण्यास संधी उपलब्ध करुन दिली आहे.

आयईपीएफ नियमांच्या नियम ६ च्या अनुसार भागधारकांची नावे आणि त्यांचा फोलिओ नंबर/डिपी आयडी-क्लाईंट आयडी, ज्यांचे भाग आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरण होण्यास पात्र आहेत, या संदर्भातील तपशीलवार माहिती व भागधारकांनी आवश्यक कृती करण्यासाठी लागणारी माहिती आमच्या (**www.asianpaints.com**) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

डिपॉझिटरीज कायदा, १९९६ च्या तरतूदीच्या अंतर्गत कंपनी आयईपीएफ प्राधिकरणाकडे जर न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाचा ठराविक आदेश असल्यास संवैधानिक प्राधिकरणाने असे समभाग आणि लाभांशाचे प्रदान स्तांतरीत करण्यास प्रतिबंधित केले असल्यास किंवा असे समभाग तारण किंवा गहाण ठेवले असल्यास कंपनी समभाग हस्तांतरीत करणार नाहीत.

शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१ पर्यंत भागधारकांकडून सदर समभागांच्या बाबतीत वैध दाव्यांची स्वीकारणी झाली नाही तर समभागांचे आयईपीएफ नियमांच्या अंतर्गत विनिर्दिष्ट प्रक्रियेनुसार आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरण करण्यात येईल.या संबंधीत कृपया नोंद घ्यावी की -

i. *प्रत्यक्ष स्वरुपात भाग असल्यास:* नवीन समभाग जारी केले जातील आणि त्यानंतर कोणतीही सूचना न देता आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरीत करण्यात येतील. तसेच, असे नवीन भाग प्रमाणपत्र जारी केल्यावर आपल्या नावावर नोंदणीकृत असलेले मूळ भाग प्रमाणपत्रे आपोआप निरस्त होतील आणि बॅड डिलेव्हरी असे मानण्यात येतील.

ii. *इलेक्ट्रॉनिक स्वरुपात भाग असल्यास:* सदर भागांचे पुढील कोणतीही सूचना न देता आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये डिपॉजिटरी सहभागीच्या मदतीने थेट स्थानांतरण करण्यात येईल.

हे लक्षात घ्या की, आयईपीएफ नियमाच्या अनुसार आयईपीएफमध्ये स्थानांतरण करावयाचे भाग आणि दावा न केलेल्या लाभांशाच्या बाबतीत कंपनीच्या विरोधात कोणताही दावा दाखल करता येणार नाही. आयईपीएफ ॲथोरिटीच्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरण झाल्यानंतर भागधारकांना ऑनलाईन अर्जाद्वारे आयईपीएफ ॲथोरिटीकडून लाभांशासह समभागांची मागणी करता येईल, त्याबाबतचा तपशिल **www.iepf.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कोणत्याही स्पष्टिकरणाबाबत आमच्या रजिस्ट्रार आणि ट्रांसफर एजंटशी संपर्क साधावा.

टीएसआर दाराशॉ कन्सलटंट्स प्रायव्हेट लिमिटेड
(युनिट: एशियन पेंट्स लिमिटेड)
सी-१०१, १ला मजला, २४७ पार्क, लाल बहादुर शास्त्री मार्ग,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३
टेलिफोन:+९१ २२ ६६५६ ८४८४ फॅक्स: +९१ २२ ६६५६ ८४९४
टोल फ्री नं.: १८०० २१०० १२४
ई-मेल: csg-unit@tcplindia.co.in

एशियन पेंट्स लिमिटेड
सही/-
आर. जे. जयमुरुगन
सीएफओ अँड कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१/०७/२०२१

कामासाठी यायचं, कामापुरतं बोलायचं, काम मार्गी लागताच गर्दी कमी करायची, ही अजितदादांची पद्धत. नेत्याच्या आजूबाजूला घोटाळणारे, दिखावूपणा करणारे, पाया पडणारे कार्यकर्ते दादांना नको असतात. गोड गोड बोलून एखाद्या माणसाला घोळवत ठेवणं दादांच्या पठडीत बसणारं नाही. ओठात एक पोटात एक हा दादांचा स्वभाव नाही. समोर आलेल्या माणसाशी आडपडदा न ठेवता सडेतोड बोलणारे अजितदादा. जे समाजाच्या, राज्याच्या हिताचे वाटले ते काम जिथल्या तिथं निर्णय घेऊन मार्गी लावणारा हा माणूस. अनावधानाने आपल्याकडून घडलेल्या आगळिकीबद्दल पुढच्याच क्षणी दिलगिरी व्यक्त करण्याइतका मनाचा सच्चा माणूस म्हणजे अजितदादा.

अजितदादा नावाचा माणूस!

फणस जसा काटेरी दिसतो, पण त्याचा गर मधुर असतो, तसे दादांचे व्यक्तिमत्त्व आहे. संकटकाळात मित्रासाठी जीवाला जीव देणारा हा माणूस आहे. संघर्ष करून परिस्थितीवर मात करून कर्तृत्व सिद्ध करणाऱ्यांचे कौतुक करताना दादा कधी हात आखडता घेत नाहीत. माता-पित्यांचे छत्र हरपलेला पाल्य, रुग्णांच्या आधारासाठी पुढे येणारा दादांचा मदतीचा हात पाहिला की दादांमधल्या हळव्या माणसाचे दर्शन घडते.

कामाचे आणि वेळेचे नियोजन हे अजितदादांचे आणखी एक वैशिष्ट्य. दिवसाचे चोवीस तास कामाचे ते काटेकोर नियोजन करतात.

राज्यभरात कोठेही असले तरी त्यांच्याबरोबर जी बॅग असते त्या बॅगेतील कागदपत्रांची दादांनी व्यवस्थित रचना केलेली असते. त्यामुळे कागदांची- निवेदनांची कितीही गर्दी असली तरी हवा तो कागद बॅगेतून काढून संबंधित अधिकाऱ्याला त्यावर तत्परतेने कार्यवाही करण्याच्या सूचना ते देतात.

अजितदादांची काही स्वभाव वैशिष्ट्ये आहेत. अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंब ते कधीच वाया जाऊ देत नाहीत.

अत्यंत सक्षम व उच्च प्रतिच्या नेतृत्वाचे गुण लाभलेला हा कर्तव्यनिष्ठ नेता. साहजिकच यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, शरद पवार या नेत्यांशी त्यांची पावलो पावली तुलना होऊ लागली. त्यामुळे या महान विभूतींमधले अष्टावधानित्व अजितदादांमध्ये शोधण्याची समाजधुरिणांमध्ये अहमहमिकाच लागली. शालेय जीवनात शांत, लाजराबुजरा असलेला अजित शरद पवार साहेबांच्या संस्कारात खऱ्या अर्थाने आज महाराष्ट्राला हवाहवासा वाटणारा अजितदादा झाला आहे. बदलत्या काळानुसार महाराष्ट्राला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला समर्थ नेतृत्व देऊन देशपातळीवर राज्याला व पक्षाला पुढे नेण्याची धमक अजितदादांमध्ये आहे. निवडणुकीचे फक्त १५ दिवस राजकारण आणि उरलेला सदासर्वकाळ फक्त समाजकारण या भावनेने काम करणारे अजितदादा. त्यामुळे विरोधकांची कामेही तितक्याच तडफेने करून देणाऱ्या अजितदादांकडे प्रत्येक आमदार आपुलकीने येतो आणि मंत्रालयातील त्यांच्या कक्षात जाऊन त्यांच्या डब्यातील जेवणाचा आस्वाद घेतो.

१९८४ साली काटेवाडीच्या विविध कार्यकारी सोसायटीपासून सामाजिक कामाला आरंभ केला. १९९१ साली अजितदादा पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेवर निवडून आले. जागतिकीकरण- मुक्त अर्थव्यवस्था यांच्याशी सांगड घालत जिल्हा बँकेच्या कामात दादांनी लक्ष घातले. बँकेला होणाऱ्या फायद्याचा शेतकऱ्याला लाभ झाला पाहिजे. या भूमिकेतून शून्य टक्के

दराने शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत पीककर्ज व महिला बचत गटांना अर्थसहाय्य उपलब्ध केले. पुण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी जिल्हा बँकेचे प्रशस्त मुख्यालय साकारले. अजितदादांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व निभावले. कृषी पर्यटन, भीमथडी व पवनाथडी जत्रा महोत्सवांतून महिला बचत गटाच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यामुळे देशाचे तत्कालीन अर्थमंत्री स्व. अरुण जेटली यांनी पुणे जिल्हा बँकेचे कौतुक केले. छत्रपती, सोमेश्वर आणि माळेगाव या तीनही सहकारी साखर कारखान्यांतून अजितदादांनी नेतृत्व केले. याशिवाय बारामती को-ऑप. बँक, विद्या प्रतिष्ठान, पुणे जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ, खरेदी विक्री संघ, दूध संघ, रयत शिक्षण संस्था अशा विविध पातळ्यांवर अजितदादांनी केलेल्या प्रत्येक कामाबाबत स्वतंत्रपणे लिहावे लागेल. राज्याच्या विधिमंडळापासून देशाच्या संसदेपर्यंत कामाचा अनुभव घेतलेले बहुआयामी नेतृत्व अजितदादांच्या रूपाने महाराष्ट्राला लाभले आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते अजितदादा पवार यांचा आज ६२ वा वाढदिवस. त्यानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे तमाम कार्यकर्ते आणि दादांच्या असंख्य चाहत्यांच्या वतीने त्यांना मनपूर्वक शुभेच्छा!

कॅप्टन आशिष दामले
शहराध्यक्ष, बदलापूर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मो. ७७९६६६८००१

दिनेशचंद्र हुलवळे, सचिव, मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मो. ९८९२८६१६३५